# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 09 October 2024

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## **आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

## **प्रादेशिक बातम्या**

## **दिनांक ०९ ऑक्टोबर २०२४ सकाळी ७.१० मि.**

****

- पंतप्रधानांच्या हस्ते आज हिंगोली आणि जालना वैद्यकीय महाविद्यालयासह विविध प्रकल्पाचं भूमीपूजन आणि उद्घाटन
- जम्मू-काश्मीर आणि हरियाणा विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर
- राज्यात सर्वच उपसा सिंचन योजनांच्या सौरऊर्जीकरणासाठी २९ हजार कोटी रुपये निधी प्राप्त
- अल्पसंख्याक समाजातल्या विद्यार्थ्यांसाठीच्या राज्यातल्या पहिल्या वसतिगृहाचं सिल्लोड इथं भूमीपूजन
- चित्रपट सृष्टीने महिला नेतृत्वातल्या विकासाच्या दृष्टीने अधिक प्रयत्न करण्याचं राष्ट्रपतींचं आवाहन, ७० वे राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार प्रदान

आणि

- महिला टी-ट्वेन्टी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज भारत-श्रीलंका सामना

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज राज्यातल्या १२ हजार ६४५ कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पाचं भूमीपूजन आणि उद्घाटन दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून होणार आहे. जालना आणि हिंगोली यासह मुंबई, नाशिक, बुलढाणा, वाशिम, अमरावती, भंडारा, गडचिरोली आणि अंबरनाथ याठिकाणच्या दहा वैद्यकीय महाविद्यालयाचे उद्घाटन, तसंच नागपूर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या अद्ययावतीकरण प्रकल्पाची आणि शिर्डी विमानतळाच्या नवीन टर्मिनल इमारतीची पायाभरणी पंतप्रधान करणार आहेत. भारतीय कौशल्य संस्था आणि महाराष्ट्रात विद्या समीक्षा केंद्राचे उद्घाटनही त्यांच्या हस्ते होणार आहे.

****

हरियाणा आणि जम्मू काश्मीर विधानसभा निवडणुकीचे निकाल काल जाहीर झाले. हरियाणात भाजपला तिसऱ्यांदा जनतेनं सत्तास्थापनेचा कौल दिला असून, जम्मू काश्मीरमध्ये नॅशनल कौन्फ्रन्स आणि काँग्रेस आघाडीला स्पष्ट बहुमत मिळालं आहे.

हरियाणा विधानसभेच्या ९० जागांपैकी भाजपने ४८,जागांवर विजय मिळवला असून, काँग्रेसने ३७ विजय मिळवला आहे. इंडियन नॅशनल लोकदलाला दोन जागा मिळाल्या तर तीन जागांवर अपक्ष उमेदवार विजयी झाले आहेत.

जम्मू काश्मीर विधानसभेच्या ९० जागांपैकी नॅशनल कौन्फ्रन्सने ४२ जागा तर त्यांचा मित्र पक्ष असलेल्या काँग्रेसने सहा जागा जिंकल्या आहेत. भारतीय जनता पक्षाने २९ जागांवर विजय मिळवला. पीपल्स डेमोक्रेटिक पार्टीला तीन, तर जम्मू काश्मीर पीपल्स कौन्फ्रन्स, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष तसंच आम आदमी पक्षाला प्रत्येकी एक जागा मिळाली असून, सात जागांवर अपक्ष उमेदवार जिंकले आहेत.

****

राज्यात महाविकास आघाडीचं सरकार आल्यास मुख्यमंत्री कोण असेल ते जाहीर करावं, या मागणीचा, शिवसेना उद्धव बाळसाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी पुनरुच्चार केला आहे. काल पक्षातर्फे मुंबईत झालेल्या वज्र निर्धार परिषदेत ते बोलत होते. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर करावा, आपण त्याला पाठिंबा देऊ असं उद्धव ठाकरे यांनी सांगितलं.

****

राज्यातल्या सर्वच उपसा सिंचन योजनांसाठी आता सौरऊर्जीकरण करण्यात येणार आहे. त्यासाठी केंद्र शासनाने राज्यशासनाला जवळपास २९ हजार कोटी रुपये निधी दिला असल्याचं, उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. ते काल सोलापूर इथं मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेच्या वचनपूर्ती सोहळ्यात बोलत होते. सध्या या योजनेच्या पहिल्या टप्प्यात १२ हजार कोटी, तर दुसऱ्या टप्प्यात तीन हजार कोटी रुपयांची कामं सुरु असल्याचं फडणवीस यांनी सांगितलं. उपमुख्यमंत्री अजित पवार यावेळी उपस्थित होते. लाडकी बहीण योजनेसह कोणतीही योजना बंद होणार नाही, यासंदर्भात विरोधकांच्या खोट्या प्रचाराला बळी पडू नका, असं आवाहन दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी केलं. ते म्हणाले...

**''या योजना बंद करा अशा प्रकारची या सावत्र भावांनी याचिका दाखल केली आहे. पण मी तुम्हाला सांगतो,तुमचे सख्खे भाऊ मुंबईमध्ये बसले आहेत.काहीही झालं तरी आम्ही या योजना बंद होऊ देणार नाही.''**

**''एक तर घोषणा देताना दहादा विचार करु, परंतू विचार पूर्वक योजना दिल्यावर मागे हटणार नाही. उद्याच्याला विरोधक येऊन काहीही खोटं नाटं रेटून सांगतील,कृपा करुन लोकसभेच्यासारखा विश्वास ठेवू नका.''**

****

केंद्र सरकारच्या विविध योजना आणि अभियानांच्या माध्यमातून अल्पसंख्याक, दुर्बल आणि गरजू घटकांची प्रतिष्ठा जपत, त्यांचा विकास केला जाईल, असं प्रतिपादन, केंद्रीय अल्पसंख्याक विकास मंत्री किरेन रिजीजू यांनी केलं आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सिल्लोड इथं प्रधानमंत्री जनविकास कार्यक्रमांतर्गत उभारण्यात येणाऱ्या वसतिगृहाचं भूमिपूजन काल रिजीजू यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. राज्यातल्या पहिल्या अल्पसंख्याक मुलां-मुलींसाठी उभारण्यात येणाऱ्या वसतिगृहासाठी ३६ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला असल्याचं त्यांनी सांगितलं.

****

मराठवाड्यातल्या मराठा समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी मराठवाड्यात क्रांतीसूर्य अण्णासाहेब जावळे पाटील यांच्या नावाने एक नवीन महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली काल झालेल्या मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या महामंडळाच्या माध्यमातून मराठा समाजाच्या तरुणांना उद्योगासाठी २० लाख रुपयांपर्यंत वैयक्तिक कर्ज व्याज परतावा देण्यात येईल, तसंच त्यांच्या स्वयंरोजगारांसाठी विविध योजना राबवण्यात येतील.

****

राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन हे आज बीड तसंच जालना दौऱ्यावर येत आहेत. छत्रपती संभाजीनगर इथून सकाळी दहा वाजेच्या सुमारास ते हेलिकॉप्टरने बीडकडे प्रयाण करतील. दुपारी दोन वाजेपर्यंत विविध क्षेत्रातल्या मान्यवरांशी संवाद साधून सव्वा दोन वाजताच्या सुमारास हेलिकॉप्टरने ते जालन्याकडे प्रयाण करणार आहेत.

****

चित्रपट सृष्टीने महिला नेतृत्वातल्या विकासाच्या दृष्टीने अधिक प्रयत्न करण्याचं आवाहन, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. काल नवी दिल्लीत सत्तरावे राष्ट्रीय पुरस्कार प्रदान केल्यानंतर त्या बोलत होत्या. केंद्रीय महिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव, राज्यमंत्री एल मुरुगन यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. चित्रपट हे समाजावर परिणाम करणारं सशक्त माध्यम असल्याचं मत राष्ट्रपतींनी व्यक्त केलं. त्या म्हणाल्या...

***''अधिकांश उच्च शिक्षण संस्था में पुरस्कार पाप्त करनेवाले छात्राओं की संख्या छात्र से अधिक होती है। ऐसे ही बदलाव रोजगार और उद्योग जगत में भी होना चाहिये। फिल्म उद्योग द्वारा वुमेननेड डेव्हल्पमेंट की दिशा में और अधिक प्रयास किया जा सकता हैं। फिल्मे और सोशल मिडिया समाज को बदलने का सबसे अधिक मजबूत माध्यम हैं। लोगों में जागरुकता पैदा करने के लिए जितना असर उन माध्यमोंसे पडता हैं, उतना किसी और माध्यम से संभव नही।''***

सर्व पुरस्कार प्राप्त कलाकारांचं राष्ट्रपतींनी अभिनंदन केलं. ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांना चित्रपट सृष्टीतल्या योगदानासाठीचा दादासाहेब फाळके पुरस्कार देऊन यावेळी गौरवण्यात आलं. याशिवाय, दीपक दुआ यांना उत्कृष्ट चित्रपट समीक्षेसाठी सुवर्ण कमळ देऊन गौरवण्यात आलं. चित्रपट विषयावरील सर्वोत्कृष्ट पुस्तकासाठीचं सुवर्णकमळ अनिरुद्ध भट्टाचार्य यांना `किशोर कुमार-द अल्टीमेट बायोग्राफी` या पुस्तकासाठी प्रदान करण्यात आलं. कांतारा चित्रपटातल्या भूमिकेसाठी ऋषभ शेट्टी यांना, पदार्पणातल्या दिग्दर्शनासाठी प्रमोद पुन्हाना यांना तर मल्याळी दिग्दर्शक आनंद एकर्षी यांच्या आटम या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट चित्रपटासाठीचं सुवर्णकमळ प्रदान करण्यात आलं. मुरमुर्स ऑफ ज जंगल या मराठी माहितीपटासाठी सोहील वैद्य यांना तसंच सचिन सूर्यवंशी यांच्या वारसा या चित्रपटाला राष्ट्रपतींच्या हस्ते रौप्यकमळ प्रदान करण्यात आलं.

****

शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग आणि पु ल देशपांडे कला अकादमीच्या वतीने घेण्यात आलेल्या, यंदाच्या उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेत, परभणी इथल्या भारत माता गणेश मंडळाला प्रथम पुरस्कार जाहीर झाला आहे. द्वितीय पुरस्कार ठाणे इथल्या जय भवानी मित्र मंडळ आणि तृतीय पुरस्कार लातुरच्या वसुंधरा वृक्षरुपी गणेशोत्सव यांना जाहीर झाला आहे. याशिवाय ३३ जिल्हास्तरीय

पारितोषिक विजेत्यांमध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या कुलस्वामिनी प्रतिष्ठान गणेश मंडळाला जिल्हास्तरीय पारितोषिक जाहीर झालं आहे.

****

हिंगोली इथं जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी काल आगामी विधानसभा निवडणुकीच्या पूर्वतयारीचा आढावा घेतला. निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी सर्व नोडल अधिकार्यांनी निवडणुकीच्या घोषणेपासून ते मतदानाचा निकाल जाहीर करण्यापर्यंत प्रत्येक टप्प्यावर कामाचं सूक्ष्म नियोजन करण्याची सूचना त्यांनी यावेळी केली.

****

तुळजापूर इथं श्री तुळजाभवानी देवीची आज शेषशायी अलंकार महापूजा बांधण्यात येणार आहे. पाचव्या माळेपासून श्री तुळजाभवानी देवीची विविध अलंकार रुपातील पूजा मांडण्यात येते. काल सहाव्या माळेला देवीची मुरली अलंकार महापूजा बांधण्यात आली होती.

****

नागरिकांना लोकाभिमुख, पारदर्शक आणि गतिमान सेवा द्यावी, असे निर्देश राज्य लोकसेवा हक्क आयोगाचे आयुक्त डॉ. किरण जाधव यांनी दिले. छत्रपती संभाजीनगर इथं काल लोकसेवा हक्क अधिनियमाच्या अंमलबजावणीचा आढावा घेतल्यानंतर ते बोलत होते. सर्व विभागांनी ऑफलाईन सेवा, तात्काळ ऑनलाईन पद्धतीत रूपांतरित करून नागरिकांना उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही जाधव यांनी यावेळी केल्या.

****

धाराशिव इथं उभारण्यात येणाऱ्या राज्यातल्या पहिल्या टेक्निकल टेक्सटाईल पार्कच्या पहिल्या टप्प्यात रस्ते विकासासाठी साडे चोवीस कोटी रूपयांच्या कामांना काल प्रशासकीय मान्यता देण्यात आली. विविध पायाभूत सुविधांकरता ११४ कोटी रूपयांचा आराखडा तयार करण्यात आला असल्याचं आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी सांगितलं.

****

दुबईत सुरू असलेल्या महिलांच्या टी – ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारताचा सामना आज श्रीलंकेविरुद्ध होणार आहे. भारतीय वेळेनुसार संध्याकाळी साडे सात वाजता हा सामना सुरु होईल.

पुरुष क्रिकेटमध्ये, भारत आणि बांगलादेश यांच्यात तीन टी –२० सामन्याच्या मालिकेतला दुसरा सामना आज दिल्ली इथं खेळला जाणार आहे.

****

नांदेड शहरासह जिल्ह्यात काल अनेक ठिकाणी जोरदार पाऊस झाला. कंधार तालुक्यात मसलगा इथं एका महिलेचा अंगावर वीज कोसळून मृत्यू झाला तर दोन महिला गंभीर जखमी झाल्या. छत्रपती संभाजीनगर परिसरात काल पावसाच्या हलक्या सरी कोसळल्या. मराठवाड्यात लातूर, नांदेड, जालना आणि बीड शहरात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

****